# पंखे, कूलरनिर्मिती क्षेत्रात बजाज आता फूलफ्लेज

## हिमाचलमध्ये प्रकल्प : केवळ असेंब्लिंग नाही तर पूर्णतः उत्पादन करणार

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १० : सध्या केवळ बांधणी (असेंबल) करण्यात येणारी पंखे, कूलरसारखी उत्पादने लवकरच 'बजाज इलेक्ट्रिकल्स' स्वतः पूर्णतः निर्माण करणार असून, हा प्रकल्प उत्तरेतील हिमाचल प्रदेश येथे पुढील आर्थिक वर्षात सुरू करण्यात येणार आहे. यासाठीच्या निधीची तजवीज कंपनीने आतापासूनच सुरू केली आहे.

बजाज समूहातील 'बजाज इलेक्ट्रिकल्स'ने मान्यताप्राप्त संस्थात्मक खरेदीदारांसाठी (क्यूआयपी) २० लाख ५० हजार कंपनी समभाग उपलब्ध करून दिले असून, या माध्यमातून कंपनी सुमारे १६० कोटी ७९ लाख रुपये उभारणार आहे. यापैकी काही रक्कम ही कंपनी कर्जाच्या परतफेडीसाठी; तर उर्वरित रक्कम ही नव्या प्रकल्प, उत्पादनासाठी गुंतविणार आहे. 'क्यूआयपी'मुळे कंपनीतील प्रवर्तकांचा हिस्सा ७३.५ टक्क्यांवरून ६५.५ टक्के होणार आहे; तर कर्जाचे प्रमाण चालू आर्थिक वर्षअखेर ०.९ टक्क्यावरून ०.५ टक्का होणार आहे.

याबाबत 'बजाज इलेक्ट्रिकल्स'चे कार्यकारी संचालक अनंत बजाज यांनी सांगितले, की 'क्यूआयपी'च्या माध्यमातून कंपनी १६० कोटी ७९ लाख रुपये उभारत आहे. यापैकी काही रक्कम कर्ज अदा करण्यासाठी खर्च करण्यात येणार असून, उर्वरित रक्कम ही नवे व्यवसाय पादाक्रांत करण्यासाठी राखून ठेवण्यात येणार आहे.

### नव्या वर्षात प्रारंभ

कंपनी हिमाचल प्रदेशात पंखे आणि कूलरसारखी काही उत्पादनांची निर्मिती करण्याकरिता प्रकल्प उभारत असून, नव्या आर्थिक वर्षात या कामाला प्रगती होईल, असे अनंत बजाज यांनी सांगितले. कंपनी सध्या या उत्पादनांचे पुणे येथील प्रकल्पात जुळवणी करते; तसेच या उत्पादनांसाठी बाहेरच्या कंपन्यांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य घेतले जाते. त्यामुळे भविष्यात ही उत्पादने कंपनी स्वतः पूर्णत्वाने करू शकेल, असेही बजाज यांनी सांगितले.

### विद्युत जनित्रनिर्मिती

कंपनी 'मोनोपोल' या विद्युत जनित्रनिर्मितीच्या कार्यावर अधिक भर देत असून, मोबाईलसाठीच्या टॉवरचेही कामकाज प्रगतिपथावर सुरू असल्याचे बजाज यांनी सांगितले. यासाठी कंपनीच्या पुणेनजीकच्या रांजणगाव येथील प्रकल्पातील उत्पादननिर्मिती क्षमताही वाढविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.